# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय राज्यविषयक सिद्धांतः तत्त्व आणि व्यवहार

मोहन रमेश कांबळे संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

..............................................................................................................................................

**गोषवारा (Abstract)**

जगाच्या इतिहासात अगदी प्राचीन काळापासून सर्वच राज्यसंस्था या त्यांच्या पद्धतीनुसार निर्माण झाल्या. नंतरच्या कालखंडात त्यांच्यातील सांस्कृतिक घुसळणीने त्या भ्रष्टही झाल्या. अशाच प्रकारे भारतीय राज्यसंस्था ही प्राचीन कालखंडात पूर्वी हडप्पा आणि मोहेंजोदडो काळात समृद्ध आणि प्रतिष्ठित होती. मात्र तिच्याही सांस्कृतिक भेसळीतून ती लयास गेली. तिच्यामध्ये वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, सतीप्रथा, अस्पृश्यता, देवदासी इत्यादी अनेक अनिष्ट प्रथा–परंपरांचा शिरकाव होवून ती ही भ्रष्ट झाली होती. या राज्यसंस्थेच्या स्वरूपाची चर्चा या आधुनिक कालखंडातील नेत्यांनी केली. त्यामध्ये महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे अनेक नेते उदयास आले. व त्यांनी आधुनिक राज्याचा आग्रह धरला.

अशा प्रकारचे आधुनिक राज्य ब्रिटीश वसाहतीच्या माध्यमातून भारतावर स्थापण झाले. त्याची चर्चा व भारतीय राज्यसंस्थेची भूमिका कशी असावी याची मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली दिसून येते. आज जागतिकीकरणाच्या युगात राज्यसंस्थेवर खूपच मर्यादा येत आहेत. भारतात अल्पसंख्यांकांचे आर्थिक दृष्टया दुर्बलांचे, वंचित स्त्रीयांचे, शोषित पिडीत वर्गाला योग्य असा न्याय मिळत नाही. त्याचप्रकारे भारतीय राज्यात एकात्मतेला फुटीरतेचा धोका संभवत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रूपयाचे अवमूल्यन अजूनही होत आहे. या सगळयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले सर्वसमावेशक राज्यसमाजवादी विचार न्याय देवू शकतील असे वाटते.

**प्रस्तावना** राज्यशास्त्र विद्याशाखेत प्रामुख्याने राज्यविषयक विचार प्लेटो, ॲरिस्टॉटल पासून सर्वच तत्त्ववेत्यांनी मांडले आहेत. काळानुसार राज्याची संरचनाही बदलत गेली. ती प्राचीन काळात धर्मतत्त्ववादी, मूलतत्त्ववादी अशी होती. सध्या ती आधुनिक स्वरूपात विकसित होताना दिसते. राज्यसंस्था ही व्यक्ती व समाज यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करीत असते. तसेच त्यांच्यातील संबंध असे असावेत याचीही चर्चा करते. राज्य हे समाजाच्या गरजेतून निर्माण झाले असे मत ग्रीक तत्त्ववेत्यांनी मांडले. मध्ययुगीन काळात राज्याचा दैवी सिद्धांत, सामाजिक करार सिद्धांत, बळाचा सिद्धांत, आदर्शवादी सिद्धांत व मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत असे नवीन सिद्धांत अनेक राज्यशास्त्रज्ञांनी मांडलेले दिसून येतात. परंतू त्या सर्वांमध्ये लोकशाही विचाराची चर्चा ही फार कमी झालेली दिसते.

मध्यावतीत हे दैवी सिद्धांत मागे पडून हॉब्ज, लॉक, रूसोच्या माध्यमातून सामाजिक करार सिद्धांताची मांडणी झाली. त्यामध्ये रूसोने राज्याच्या स्थपनेसाठी लोकांच्या इच्छेला महत्त्व देवून (General Will) ची संकल्पना मांडली. व या इच्छेवर राज्याची स्थापना होवून युरोपात क्रांती झाली. युरोपमध्ये सर्वप्रथम राज्यसंस्थेची स्थापना होवून राज्यासाठी आवश्यक नोकरशाही व संसदीय सार्वभौम प्रणाली अस्तित्वात आली. मात्र या सार्वभौम राज्याने जगावरती आपले साम्राज्य प्रस्थापित केले. या सगळयाची चर्चा पुढे येणारच आहे. तत्पूर्वी राज्य या संकल्पनेचा अर्थ काय ते पहावयास हवे.

**राज्याची व्याख्या** “A Political Community Occupying a definite territory leaving an organized government and possessing Internal and external sovereignty. Recognition of a state’s claim to independence by other states cabling. It to enter in to international engagements is important to the establishment of its sovereignty.’’

याप्रमाणे राज्याचे चार मुलभूत घटक आहेत १) भूप्रदेश, २) लोकसंख्या, ३) ाासनसंस्था, ४) सार्वभौम सत्ता होय. राज्यसंस्थेच्या अधिकाराबाबत देखिल विविध मतप्रवाह आहेत. आदर्शवादी विचारवंत राज्यसंस्थेची सत्ता अनिर्बंध आणि अमर्याद अशी मानतात. जॉन लॉक, टी.एच.ग्रीन, लास्की जनतेला राज्याविरूद्ध प्रतिकार करण्याचा अधिकार देवून राज्याचे अधिकार मर्यादीत करतात. अनेक सत्तावादी राज्य ही समाजातील इतर संस्थासारखी एक संस्था म्हणून तिचे अधिकार मर्यादीत करण्याचा आग्रह धरतात. कार्ल मार्क्स व इतर राज्यास शोषक वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था म्हणून हिणवतात व तिला वर्गीय हितसंबंध जोपासणारी एक क्रुर संस्था म्हणून तिच्या संपुष्टाला मान्यता देतात. अशा रितीने जगात सर्वत्र राज्यविषयक विचारांची चर्चा मध्ययुगात झाली. युरोपात औद्योगिक क्रांती होवून जगात सर्वत्र वसाहतवाद स्थापण झाला व त्या माध्यमातून व्यापारांनी जगभरात साम्राज्यवाद स्थापन केला. या माध्यमातून जगातील इतर छोटया स्वयंशासित राज्यांचे शोषण या वसाहतिक राष्ट्रांनी केले. आणि कारभार केला. नंतरच्या कालखंडात दोन महायुद्धे होवून वसाहतवादाला आव्हान मिळाले व जगातील राष्ट्रे ही स्वतंत्र झाली. या नवस्वतंत्र राष्ट्रांनी आपआपली सार्वभौम राज्ये नंतरच्या काळात स्थापन केली. त्यामध्ये भारतीय आधुनिक राज्याचा ही समावेश होता.

**संशोधन समस्या**

सध्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे राज्याचे कार्यक्षेत्र तसेच राज्याचे अधिकारही वाढले आहेत. शीतयुद्धानंतर जागतिक राजकारणात आलेली परिवर्तने त्यातुन पुढे आलेले उदारीकरणाचे धोरण, तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रात घडून आलेली क्रांती, माहिती तंत्रज्ञानातील प्रचंड परिवर्तने, प्रसार माध्यमांची भूमिका इत्यादीमुळे भारतीय राज्यसंस्थेवर मर्यादा येत आहेत.

**भारतीय राज्यविषयक विचारांचा आढावा**

भारतात अगदी प्राचीन कालखंडापासून राज्यविषयक विचारांची चर्चा करणेत आलेली आहे. त्यामध्ये कौटील्याचा राज्याचा सप्तांग सिद्धांत, मनुस्मृतीचा कायदा या सर्वांमध्ये राज्याच्या कार्याची चर्चा करण्यात आलेली आहे. मात्र ती लोकशाही मूल्यांशी विसंगत असल्याचे दिसून आले. बौद्ध कालखंडात गौतम बुद्धांनी ही राज्याची चर्चा सामाजिक कराराच्या माध्यमातून संघाच्या माध्यमातून घडवून आणली. पुढे, मध्ययुगीन कालखंडात भारतात अनेक प्रांतीय राज्ये

(Provincial State) स्थापन होवून त्यांचा कारभार चालत असे त्यामध्ये जवळजवळ ५५० राज्ये होती. मात्र ती सार्वभौम नव्हती. ब्रिटीशांच्या माध्यमातून भारतात १७ व्या शतकात आधुनिक राज्याचा पाया रोखला गेला व त्यांनी राज्यसंस्था स्थापन केली. त्यामध्ये त्यांनी आधुनिक चलनपद्धतीचा विकास केला. दळण वळणासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणले व या कार्यभारासाठी नोकरशाहीची स्थापणा केली. या सगळयामधून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला चालना मिळाली व भारतीय राज्यसंस्थेची चर्चा ही केंद्रभागी झाली.

भारतीय राज्यसंस्थेवर असलेली परकीय गुलामगिरी नष्ट करण्याकरिता अनेक स्वातंत्र्य चळवळींचा जन्म झाला. त्यामध्ये अनेक प्रवाह निर्माण झाले. जसे, फुले, शाहू, आंबेडकर, गांधी, नेहरू, मवाळ–जहाल असे अनेक विचार प्रवाहांनी राज्यसंस्थेची चर्चा केली. त्यामध्ये फुलेंनी बळीराजाचे राज्य, आंबेडकरांचे आधुनिक राज्य, गांधींचे हिंद स्वराज्य, नेहरूंचे समाजवादी राज्य अशा प्रकारच्या राज्यांची चर्चा या कालखंडात झालेली दिसून येते. या सर्व चर्चेला ब्रिटीश शिक्षण पद्धती कारणीभूत ठरली जी बुद्धिप्रामाण्यवादावर आधारलेली होती.

**डॉ. आंबेडकरांचे राज्यसंस्थेविषयक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्यसंस्थेचा विचार हा हिंदू धर्मातील कठोर चिकित्सेतून व टीकेतून निर्माण होतो. ते भारतीय राज्यसंस्थेवर असणाऱ्या धार्मिक वर्चस्वाची चिकित्सा करतात व ते नाकारतात. त्यांचे राज्यविषयक विचार त्यांच्या 'स्टेट ॲण्ड मायनॉरिटीज', 'अनहिलेशन ऑफ कास्ट', 'थॉट्स ऑन पाकिस्तान' इत्यादी साहित्य लेखनातून दिसून येतात. राज्य हे मानवी विकासाचे साध्य नसून साधन आहे असे त्यांना वाटते. त्यासाठी राज्याचा पूरेपूर वापर करण्याची ते चर्चाही करतात. त्यामध्ये ते राज्यामध्ये असणाऱ्या समाजाचीच प्रामुख्याने चर्चा करतात. भारतीय समाजामध्ये असणाऱ्या जातीव्यवस्थेमुळे भारतीय राज्याचे कित्येक वर्षे कशा प्रकारे नुकसान झाले याचीही चर्चा त्यांनी केली आहे. जातीव्यवस्थेच्या या व्यवस्थेमुळेच भारताने आपले वैभव गमावले असे त्यांना वाटते. त्यामुळेच जर परकीय स्वातंत्र्य नष्ट करून जर आधुनिक राज्य भारतात स्थापण करावयाचे असेल तर भारतातील जाती या नष्ट केल्या पाहिजेत अशी चर्चा ते करतात. भारतातील जाती ज्या धर्माने निर्माण केल्या त्या हिंदू धर्मावर त्यांनी कठोर टीका केली. त्यांच्यामते, भारतीय समाजात जर एकत्वाची भावना निर्माण करावयाची असेल (Sense of Being) तर जाती नष्ट झाल्या पाहिजेत. असे त्यांना वाटते. त्यांना उच्चशिक्षण घेत असताना यावर ती 'भारतातील जाती; उत्पती आणि विकास' नावाचा प्रबंध सर गोल्डन वायझर यांच्या समोर वाचला होता त्याचे नंतर ग्रंथात रूपांतर झाले.

ते मजूरमंत्री असताना त्यांनी राज्यसंस्थेच्या नोकरशाही व्यवस्थेत अनेक महत्त्वपूर्ण कायदे केले व स्त्रीया, पुरूष व बालके यांना न्याय मिळवून दिला. भारतातील नोकरशाही ही भांडवलदारांची मक्तेदारी न होता ती भारतीय समाजाची उत्तरदायी असली पाहिजे असेही त्यांना वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यसमाजवादाची संकल्पना मांडली. त्यामध्ये ते भारतीय राज्याच्या साधनांची चर्चा करतात. याबाबतीत ते राज्याची मालकी सर्वच क्षेत्रात प्रस्थापित व्हावी व त्या माध्यमातून भारतीय राज्याचा एकत्रित विकास व्हावा असेही त्यांना वाटते. राज्य हे वस्तू आणि सेवा या दोन कार्याची परिपूर्ती करते तर त्यामध्ये वस्तू हे नैसर्गिक साधन संपत्तीतून निर्माण व्हाव्यात व सेवा या आरक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध व्हाव्यात असे त्यांना वाटते. त्यासाठी त्यांनी भारतातील जमीन, पाणी, वीज आणि दळणवळण याचे व्यवस्थापनात्मक विकासाचे मॉडेल त्यांनी मांडले.

भारतीय शेतजमीन ही राज्याच्या मालकीची करून ती सहकारी तत्त्वावरती कसली जावी व त्या शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नावरती उद्योगधंदे स्थापन व्हावेत असा विचार त्यांनी मांडला. शेतीवर अवलंबून असणाऱ्या अतिरिक्त पाण्याच्या संदर्भात ही त्यांनी असाच विचार मांडला. उत्तर भारतात बारमाही नद्या वाहतात. या नद्या दक्षिणेला जोडल्यास दक्षिणेतील दुष्काळी भागाला पाणी मिळून त्यांचा विकास होईल. त्याचप्रमाणे या पाण्यावर ठिकठिकाणी धरणे, डॅम बांधून वीज निर्मिती करावी व ती पुन्हा राज्याकडून शेतकऱ्याला मोफत उपलब्ध करून द्यावी असेही त्यांना वाटते या पाण्याचा दळणवळणसाठी वापर करून घेता येईल असाही विचार त्यांनी मांडला. या माध्यमातून भारतात सामाजिक न्याय व समता निर्माण होवू शकते असा मूलगामी विचार डॉ. आंबेडकरांनी राज्यसमाजवादाच्या माध्यमातून मांडला. त्यांच्या या राजकीय विचारांना मानवतावादी तत्त्वज्ञानाची जोड मिळालेली दिसून येते. मानवी कल्याणाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक समस्यांची उकल शोधून त्यावरती पर्याय शोधने हे राज्यसंस्थेचे मुख्य ध्येय असावे, असे त्यांना वाटते.

**डॉ. आंबेडकर आणि लोकशाही राज्य**

डॉ. आंबेडकरांच्या वरती ब्रिटनच्या संसदीय लोकशाहीचा प्रभाव होता. लोकशाहीचे ध्येय हे अधिकाधिक लोकांचे ध्येय साधणे हेच असावे असे त्यांना वाटते. डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'ज्या सरकार पद्धतीत लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारक स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून आणता येतात. ती लोकशाही होय. असे त्यांना वाटते. डॉ. आंबेडकर स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हीच लोकशाहीची मुल्ये मानतात. संसदीय लोकशाहीत ते 'एक व्यक्ति एक मूल्य' या तत्त्वांचा पुरस्कार करतात. कारण एखाद्या गरीबाइतकेच मुल्य श्रीमंताला लागू करता येत नाही. गरीबाच्या जाणीवा या श्रीमंतापेक्षा अधिक तीव्र स्वरूपाच्या असतात. त्यामुळे ते 'एक व्यक्ती एक मूल्य' याचा आग्रह धरतात. त्याचप्रमाणे संसदीय लोकशाही हीच बहुसंख्यांकडून अल्पसंख्यांकांचे संरक्षण करू शकते, असेही त्यांना वाटते. संसदीय लोकशाहीमध्ये डॉ. आंबेडकर कायद्याचे राज्य मान्य करतात. याप्रकारच्या शासनयंत्रणेकडे ते एक साधन यादृष्टीने पाहतात. शासनसंस्थेत बहुमताच्या रेटयापासून अल्पसंख्यांकांचे संरक्षण करण्यासाठी सत्तेचा समतोल आणि नियंत्रणाची संकल्पना त्यांनी मांडली आहे. त्याचप्रमाणे संसदीय शासनपद्धतीत संघराज्य संरचनेचा स्वीकार करून कायदेमंडळ, न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळामध्ये स्वतंत्र राहण्याची, सत्ता विभाजनाची भूमिका त्यांच्या भारतीय संविधानाच्या निर्मितीमधून स्पष्ट होते.

**डॉ. आंबेडकर आणि धर्मसंस्था**

भारतीय समाजव्यवस्थेत असणारी जातीव्यवस्थेची मूळे शोधताना ते हिंदू धर्माची चिकित्सा करतात आणि

त्यावरती टीकाही करतात. परंतु मानवी जीवनातील धर्माचे महत्त्व ते कार्ल मार्क्स प्रमाणे नाकारत नाहीत. ते धर्म आणि धम्माकडे वेगळया दृष्टिकोनातून पाहतात. त्यांच्या मते धर्म ही वैयक्ति बाब आहे आणि धम्म ही सार्वजनिक (सामाजिक) बाब आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, धम्म म्हणजे निती होय. तो सामाजिक सिद्धांत आहे, असे त्यांना वाटते. आंबेडकर सुद्धा या माध्यमातून बौद्ध संघाच्या धर्तीवर स्वयंशासनाचाच पुरस्कार करतात. या संदर्भात ते म्हणतात की, ''बळ काढून घेतल्यावर ते राज्य कायम राखू शकेल अशी एकमेव गोष्ट म्हणजे धम्म होय. मानसाचा स्वभाव बदलण्याचे मुख्य साधन म्हणजे धम्म होय, असे त्यांना वाटते. त्यांनी आपले विचार 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात मांडलेले आहेत. त्यांचे हे विचार समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारलेले आहेत.

प्रज्ञा, शील आणि करूणा ही धम्माची मूल्ये होत. प्रज्ञा म्हणजे सखोल बुद्धी तेथे प्रत्येक गोष्टीचा विवेकाने आणि तार्किकतेने विचार होतो. तेथे अंधश्रद्धेला थारा नसतो. तसेच शील म्हणजे (सदाचरण) चांगले वर्तन होय. त्याचप्रमाणे करूणा म्हणजे प्रेम समाजाचा भौतिक विकास होण्यासाठी करूणेची नितांत गरज असते. करूणेशिवाय माणसे एकमेकांशी जोडता येत नाहीत. तसेच करूणेशिवाय समाजात शांतता आणि सुव्यवस्था नांदूच शकत नाही, असेही त्यांना वाटते. त्यांच्या मते, ''बुद्धाने संघामध्ये हुकूमशाहीशिवाय साम्यवाद प्रस्थापित केला हे आश्चर्य लेनिनला सुद्धा करता आले नाही. '' अशाप्रकारे त्यांचा बौद्ध धम्म हा विज्ञानवादी आहे. त्यांचा बौद्ध धम्म हा चार आर्यसत्य, पंचशील, अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता व त्यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा यावरती आधारलेला आहे. त्यांचा धम्म हा परिवर्तनवादी आहे. यामुळे ते असे म्हणतात की, ''धम्माचा हेतू हा जगबदलाचा आहे. आपल्या आयुष्याच्या शेवटी १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर येथे त्यांनी बौद्ध धम्माची दिक्षा घेतली व सारा भारत मी बौद्धमय करीन, अशी प्रतिज्ञा केली.

**समारोप**

पंडित नेहरूंनी समाजवादाचा आग्रह धरला होता. मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. आणि समाजवादी विचार राज्यसंस्थेवर सोपविले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संविधानात राज्य समाजवादाची तरतूद करावयाची होती ती त्यांना कॉंग्रेसच्या बहुमतामुळे करता आली नसावी असे वाटतेशेवटी डॉ. आंबेडकरांचे राज्यविषयक विचारांचा सारासार विचार केला असता असे दिसून येते की, त्यांनी राज्यसंस्थेकडे कल्याणकारी राज्याच्या भूमिकेत विचार मांडले आहेत. गरजा, भय, छळ आणि शोषणमुक्त समाज निर्माण करणे हे त्यांच्या राज्याविषयक विचारांचा गाभा होय. व्यक्तिहित व समाजहित साधण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही हक्क यांच्याबरोबरच राज्यसंस्थेला आर्थिक क्षेत्रातील तिच्या सहभागाने व मार्गदर्शनाने सर्व क्षेत्रात समन्वय साधला जातो. राज्यसंस्थेच्या या परिवर्तनवादी व समन्वयवादी भूमिकेवर डॉ. आंबेडकरांचा भर असलेला दिसून येतो असे वाटते. यासाठी त्यांनी घटनावादाचा पुरस्कार केला व भारतीय संविधानाची निर्मिती केली. या संविधानातून सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

**संदर्भ**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९७९): 'Writing & Speeches' Volume , Education Department, महाराष्ट्र शासन.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (२०१४): 'राज्ये आणि अल्पसंख्यांक' प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.
३. किर धनंजय (१९९०): 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' (खंड), सुगावा प्रकाशन, पुणे.
४. खैरमोडे चांगदेव (२०१०): 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' (खंड), सुगावा प्रकाशन, पुणे.
५. बाबर अशोक (सप्टे.२०१६): आंबेडकरवाद, कोटी ॲन्ड बाबर पब्लिशर्स एल एल पी, सोलापूर.
६. बी. के. नागला (२००८): 'इंडियन सोशॅलॉजीकल थॉट्स', रावत पब्लिकेशन, जयपूर.
७. डॉ. चौसाळकर अशोक (२०११): 'प्राचीन भारतीय राजकीय विचार', प्रतिमा प्रकाशन, नागपूर.
८. गणवीर रत्नाकर (१९८७): 'डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल', रत्नमित्रा प्रकाशन, नागपूर.
९. कांबळे बी. सी. (संपा.) (२०१४): 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली भारतीय घटनेची मीमांसा', सुगावा प्रकाशन, पुणे.
१० डॉ. बाबासाहेब आंबेडकर: 'शुद्र पूर्वी कोण होते?', सुगावा प्रकाशन, पुणे.
११ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (२०१६): 'बुद्ध आणि त्याचा धम्म', एक्सप्रेस पब्लिकेशन, कोल्हापूर.
१२ शेषराव मोरे (१९९८): 'डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण: एक अभ्यास', राजहंस प्रकाशन, पुणे.
१३ डोळे ना.य. (१९६९): 'राजकीय विचारांचा इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन,पुणे.
१४. भारतीय संविधान (२०१४): 'विधी व न्याय मंत्रालय प्रकाशन', भारत सरकार, नवी दिल्ली.
१५. डॉ. चौसाळकर अशोक (संपा.) (ऑक्टोबर ते डिसेंबर २०१६): 'समाज प्रबोधन पत्रिका', समाज प्रबोधन संस्था, कोल्हापूर.

**वर्तमानपत्रे...** मूकनायक (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर